Dr
१४/७/२२
११:२०

# उल्हासनगर महानगरपालिका
## माहिती व जनसंपर्क विभाग

दिनांक : १४/०७/२०२२

## प्रसिध्दी पत्रक (प्रेसनोट)

उल्हासनगर महानगरपालिका अंतर्गत "स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव" अंतर्गत "हर घर तिरंगा" अभियान विद्युत विभाग व वैद्यकीय आरोग्य विभाग यांच्या संयुक्त विद्यमानाने उल्हासनगर महानगरपालिका अंतर्गत कार्यरत अधिकारी व कर्मचारी यांचे मा. आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका यांचे मार्गदर्शनाखालील दिनांक १३/०७/२०२२ रोजी सकाळी ११.०० वा उल्हासनगर महानगरपालिका मुख्यालय येथे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

सदर रक्तदान शिबिरास उल्हासनगर महानगरपालिका अधिकारी व कर्मचारी यांनी उत्सफुर्त प्रतिसाद दिला असून एकुण ५० बॉटल रक्त संकलन करण्यात आलेले आहे. सदर रक्तदान संकलनाचे काम हे मध्यवर्ती रुग्णालय, उल्हासनगर-३ येथिल डॉ.ससाणे व त्यांची संपुर्ण तांत्रिक टिम यांनी पुर्ण केले आहे. सदर संकलित केलेल्या रक्ताचा वापर हा उल्हासनगर शहरातील थॅलेसिमिया ग्रस्त रुग्णांसाठी करण्यात येणार आहे.

सदर रक्तदान शिबिरास मा. आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका, अतिरिक्त आयुक्त (सेवा), अतिरिक्त आयुक्त (शहर), उप आयुक्त (वैआवि), वैद्यकीय आरोग्य अधिकारी, कार्यकारी अभियंता (विद्युत), मुख्य लेखा अधिकारी, मुख्य लेखा परिक्षक, सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी उपस्थिती राहून रक्तदान शिबिरात मध्ये सहभाग घेवुन सामाजिक कार्यात सहभाग नोंदविला आहे.

प्रतिजनसंपर्क अधिकारी
१४/७/२२

जनसंपर्क अधिकारी
उल्हासनगर महानगरपालिका

प्रत – योग्य त्या कार्यवाहिस्तव रवाना.

१) पत्रकार कक्ष, उल्हासनगर महानगरपालिका
२) सिस्टीम ॲनलिस्ट, माहिती तंत्रज्ञान विभाग, उल्हासनगर महानगरपालिका

२) - सदरची प्रेसनोट उल्हासनगर महापालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावी.